MHKO070002822022

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४२/२०२२</u>**

**<u>मधील नि.५ वरील आदेश</u>**

**<u>चंदुलाल पुंजा पटेल वि.मालन आप्पासो गवंडी (अंबुपे)</u>**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १, २ व कलम १५१ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. **वादीचे थोडक्यात कथन असे आहे की,**

सि.स.नं. २९२० व २९२१ या मिळकतीच्या दक्षिण बाजुस व सि.स.नं.२९२२ या मिळकतीच्या उत्तर बाजुस असणारा पुर्व–पश्चिम चालीचा सुमारे १२ फुट रुंदीचा व अंदाजे ३०० फुट लांबीचा रस्ता हा दावा मिळकत व "दाव्याचा विषय" आहे येथुन पुढे सोईकरीता दावा मिळकतीस "सदर रस्ता" असे संबोधले आहे. सदर दावे सोबत वादी यांनी दावा मिळकतीचा समजुतीचा बिन स्केली हातनकाशा जोडलेला असुन तो या दावेचा भाग समजणेत यावा.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, शिरोळ येथील सि.स.नं.२९२० व २९२१ या मिळकती यातील प्रतिवादी नं.१ ते १५ यांचे मालकीच्या आहेत. तसेच सि.स.नं. २९२२ ही मिळकत प्रतिवादी नं.१६अ ते १६क यांच्या मालकीची आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, सि.स.नं. २९११ ही मिळकत वादीची मालकी वहीवाटीची असून ती सि.स.नं. २९२० च्या पश्चिम बाजूस आहे. सदर मिळकत ही वादी हे त्यांच्या लाकडाच्या व्यवसायाकरीता वापरतात. सदर सि.स.नं. २९११ ही मिळकत यातील वादी यांचे सख्खे भाऊ बाबुलाल पुंजा पटेल यांनी रजि दस्त नं.६२८० ने दि.२८/१२/२०१८ रोजी वादी यांना बक्षीसपत्राने दिली आहे.

**५.** वादीचे पुढे असे कथन आहे की, ते व त्यांचे भाऊ श्री. बाबुलाल पुंजा पटेल यांनी सि.स.नं.२९११ ही मिळकत खरेदी घेतलेपासून ते एकत्रीत सदर मिळकतीमध्ये लाकुड वखारीचा व्यवसाय करीत आहेत. वादी व त्यांचे भाऊ बाबुलाल पुंजा हे पुर्वापार सि.स.नं.२९११ मधुन शिरोळ–जयसिंगपूर या रोडकडे जाणेकरीता कायमपणे व मेनरोड वरुन सि.स.नं.२९११ मध्ये येणेकरीता कायमपणे शांततामय रितीने वहीवाट करीत आलेले आहेत.

**६.** वादीचे पुढे असे कथन आहे की, सि.स.नं. २९११ मध्ये लाकडाच्या वखारीचा व्यवसाय दावा मिळकतीतून (सदर रस्त्यावरुन) व्यवसायासाठी लागणा–या लाकडाची तसेच इतर मालाची ने–आण करणेकरीता कायमपणे वहिवाट करतात. सदर रस्त्यावरुन जाणेयेणेचा इजमेंटरी हक्क हा वादीलाच आहे. यापुर्वी वादी यांचे भाऊ बाबुलाल पटेल व त्यांना दावा मिळकत रस्त्यामधून जाणेयेणेचा व वहिवाटीचा हक्क व अधिकार प्राप्त झाला होता व आहे. त्यानंतर तो वहिवाटीचा इजमेंटरी हक्क व अधिकार बाबुलाल पटेल यांनी रजि.दस्त नं.६२८० ने दि.२८/१२/२०१८ रोजी वादी यांना बक्षीसपत्राने दिला आहे.

**७.** वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी हे वादीस त्रास देण्याच्या हेतूने व वादीचे दावा मिळकतीमधील त्यांचे जाणे–येणे बंद करावे या हेतुने वादी यांना दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करणेस सुरुवात केली आहे. तसेच प्रतिवादी नं.१६अ हे दावा मिळकतीमध्ये त्यांची मोटरसायकल लावून सदरच्या रस्त्यामध्ये वादी यांना जाणेयेणे करीता अडथळा करीत आहेत. तसेच प्रतिवादी नं.२ याचा पान पट्टीचा व्यवसाय आहे. यापुर्वी प्रतिवादी नं.२ हा दावा मिळकत सोडून एका खोक्यामध्ये व्यवसाय करीता होता. परंतु अलिकडे प्रतिवादी नं.२ याने एका नवीन मोठया खोक्यामध्ये पान शॉप व मोबाईल शॉप सुरु करुन वादीला अडथळा केला आहे. सदर बाबत वादीने प्रतिवादी नं.२ यास

विचारले असता त्यानी सि.स.नं.२९२१ मध्ये सदर ठिकाणी पक्के खोके करणार असल्याचे सांगीतले. परंतु आजतागायत खोके हलविले नाही.

८. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी माहे मे २०२१ मध्ये दावा मिळकतीमध्ये दोन ट्रॉली मुरुम टाकल्यामुळे वादीस सि.सि.नं.२९११ जाणेयेणे अशक्य झाले आहे. सदर प्रकाराबाबत वादी यांनी प्रतिवादींना सांगीतले असता यातील प्रतिवादी नं.२ व ३ यांनी वादी यांना दि.७/१/२०२२ रोजी अरेरावीची भाषा वापरुन कंपॉऊड काढणेस नकार दिला. सदर प्रतिवादी यांच्या कृत्यामुळे वादी यांचे अतोनात नुकसान होत आहे. प्रतिवादी यांनी बांधलेले तारेच कंपांऊड, तसेच टाकलेला मुरुम व ठेवलेले खोके हे बेकायदेशीर व अनाधिकाराचे असलेने ते काढुन घेणेविषयी प्रतिवादी नं.१ ते ३ यांना आज्ञार्थी हुकुम व्हावा व प्रतिवादींनी त्यांना हरकत अडथळा करु नये अशी त्यास कायम मनाई व्हावी. तसेच दावा मिळकतीमध्ये वादी यांचा जाणे–येणे वहिवाटीचा इजमेंटरी हक्क व अधिकार असलेबाबत हक्कज्ञापन होवून मिळावे. म्हणून सदर वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. तथापि सदर दावेचा अंतीम निकाल होणेस बराच कालावधी लागणार आहे. तो पावेतो प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी दावा मिळकती मध्ये पुर्व बाजुस असलेले पत्र्याचे खोके (पान पट्टी व मोबाईल शॉप) काढून, तसेच दावा मिळकतीमध्ये पश्चिम बाजुस टाकलेला मुरुमाचा ढिगारा व तारेचे कंपाऊंड काढून घ्यावे तसेच प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी दावा मिळकतीत त्यांची मोटर सायकल लावू नये म्हणून सदर प्रतिवादीचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

९. वादीचे पुढे असे कथन आहे की, त्यांना सकृतदर्शनी केस आहे. प्रतिवादी यांना तुर्तातुर्त अज्ञार्थी मनाई झालेस त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट तसे न झालेस वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे. वादी यांना त्यांच्या मिळकतीमध्ये जाणेस देखील अडचण होत आहे. तसेच वादींना त्यांचा व्यवसाय करणे देखील अडचणीचे होत

आहे व होणार आहे. बॅलन्स ऑफ कनव्हीनियन्स हा वादी यांचे बाजुने आहे. सबब, वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज खर्चासह मंजूर होणेविषयी विनंती वादी यांनी केली आहे.

**१०.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी वादीच्या नि.क्र.५ च्या अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२६ वर दाखल करुन वादीची सर्व कथने स्पष्टपणे नाकारली. दावा अर्जात नमुद मिळकती या प्रतिवादींच्या वडिलोपार्जित मिळकती असून त्यास आप्पासो राघु अंबुपे, धनपाल राघु अंबुपे व आण्णासो राघु अंबुपे यांचे पश्चात वादींची नांवे लागलेली आहेत. पैकी मिळकत १ ब पैकी पुर्व बाजूकडील काही भाग प्रतिवादीच्या पुर्वहक्कदराने बाळासो अंबुपे यांचेकडून दि.१६/१/१९८७ रोजी रजि.दस्त नं.८४/८७ ने खरेदी घेतलेली होती. अशाप्रकारे उपरोक्त मिळकती या प्रतिवादीच्या मालक म्हणून कब्जेवहिवाटीच्या असून प्रतिवादींची मालक या नात्याने दावा मिळकतीत सन १९६९ सालापासून आज तागायत कब्जे वहीवाट सुरु आहे. वादीचे पुर्वहक्कदार मयत झाल्यानंतर वादींची नांवे सदर मिळकतीच्या मालक सदरी सिटी सर्व्हे पत्रकी नमूद होत गेलेली आहेत. दावा मिळकती या एकमेकालगत पुर्वपश्चिम आहेत.

**११.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत १ब मध्ये प्रतिवादींची जुनी कौलारु राहती घरे असून त्यांनी दक्षिणेकडील बाजूस जाणेयेणे करीता साधारण १० ते १२ फुट रुंदीचा पुर्व पश्चिम चालीची रस्ता वजा मोकळी जागा सोडलेली आहे.

**१२.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादींच्या सि.सि.नं.२९२० च्या मिळकतीच्या दक्षिणेस लागून प्रस्तुत वादी यांची सि.सि.नं.२९२४ ची मिळकत आहे. मिळकत १ब ला लागून प्रतिवादी नं.१६अ ते १६क यांची सि.स.नं.२९२२ ही घर मिळकत असून ते त्यात राहतात. तर वादी हे मिळकत १अ ला

लागून दक्षिणेस २९२४ मध्ये राहतात. सदर वादीची मिळकत प्रतिवादींच्या मिळकतीला अगदी लागून आहेत.

**१३.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी आपल्या मिळकत मोजणीकरीता दि.१८/२/२०२१ रोजी हद्द निश्चिती करीता शासकीय मोजणी मागितलेली होती. त्याप्रमाणे दि. २९/६/२०२१ रोजी प्रतिवादींच्या दावा मिळकतीची शासकीय मोजणी झाली व हद्दीच्या खुणा दि.३०/६/२०२१ रोजी दाखविण्यात आल्या व प्रतिवादीला मोजणी नकाशाची क प्रत साधारण महिन्याभरानंतर मिळाली. सदर मोजणीद्वारे प्रतिवादी नं.१६ अ ते १६क यांनी प्रतिवादी नं.१ ते १५ यांच्या वर नमुद मिळकत १अ, ब मध्ये दक्षिण बाजूस व वादी याने वर नमुद मिळकत १अ दक्षिण बाजूस मध्ये प्रतिवादी नं.१ ते १५ यांचे मिळकतीत अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

**१४.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांनी आपापल्या बांधकामाद्वारे मिळकत १ब मध्ये दक्षिण बाजूस पुर्व पश्चिम चालीची ४० फुट लांबीची १२ फुट उंचीचे व दिड फुट रुंदीची भिंत बांधून प्रतिवादी नं.१ ते १५ यांच्या मिळकतीत अतिक्रमण केलेले आहे. सदर भिंतीवरुन संडास बाथरुमच्या ड्रेनेज पाईप्स बसवलेल्या असून तेही प्रस्तुत प्रतिवादीच्या मिळकतीत येतात. तसेच सदर अतिक्रमण केलेल्या भिंतीवरुन प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांनी पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन व बोअरच्या पाण्याचे कनेक्शन पाईप्स प्रस्तुत प्रतिवादीच्या हद्दीत अतिक्रमण केलेल्या भिंतीवरुन नेलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) हे आपल्या मिळकतीतील पावसाचे पाणी सदर भिंतीत असलेल्या दोन खिडकीस पत्रा असलेल्या छप–या मारुन प्रस्तुत प्रतिवादीच्या हद्दीत सोडलेले आहे. सदर छप–या व सदर भिंत त्यावरील ड्रेनेज पाईप, बोअर व पिण्याचे

पाण्याची पाईप हे सर्व प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांनी बांधलेल्या अतिक्रमीत भिंतीत बसवलेले आहे. त्यामुळे सदर भिंत व पाईप्स, छप–या हे देखील प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांनी केलेल्या अतिक्रमणाचा भाग आहे. प्रस्तुत प्रतिवादीनी सदर मोजणी नंतर प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांना अतिक्रमण निष्पन्न झाल्याने सदर भिंत, छप–या व पाईप काढून घ्यावी अशी विनंती केली मात्र त्यांनी प्रस्तुत प्रतिवादींना धुडकावुन लावले.

**१५.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत प्रतिवादीच्या दावा मिळकतीत दक्षिण बाजूस पुर्व पश्चिम चालीची पाच फुट उंचीची ९ इंच रुंदीची व ३२ फुट लांबीची कंम्पाऊंउ भिंत बांधून अतिक्रमण केलेचे मोजणीत निष्पन्न झाले. तसेच प्रस्तुत प्रतिवादीच्या हद्दीत वादीने लोखंडी खांब उभारुन त्यावर लोखंडी पत्रा असलेले छप्पर घातलेले असून लोखंडी खांब देखील प्रतिवादीच्या दावा मिळकतीत रोवलेले आहेत. सदरचे वादीचे अतिक्रमण हे प्रतिवादीच्या मिळकतीत पाऊणे दोन फुट असल्याचे मोजणीत निष्पन्न झाले आहे. प्रतिवादी यांनी वादीला अतिक्रमण काढून घेण्याची विनंती केली असता त्यांनी अतिक्रमण काढून घेतले नाही. वादीने सदर अतिक्रमणामध्ये लोखंडी खांबावर पत्रे घालून छप्पर केलेले असून त्याचे पावसाचे पाणी प्रस्तुत प्रतिवादीच्या हद्दीत पडते.

**१६.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे वादीची सर्व कथने स्पष्टपणे नाकारली व कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत प्रतिवादीच्या मिळकतीत केलेली अतिक्रमणे शासकीय मोजणीद्वारे निष्पन्न झालेली असून वादीस वारंवार सांगूनही व विनंती करुनही ते सदर आपापले अतिक्रमण काढून घेत नाहीत. त्याकरीताच प्रस्तुत प्रतिवादी यांनी वादी व इतर यांचेविरुध्द रे.क.नं.२५/२०२२ चा अज्ञार्थी मनाईचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) त्यांच्या उत्तर बाजूस असलेल्या लगतच्या

प्रस्तुत प्रतिवादीच्या दावा मिळकतीत आपले पावसाचे पाणी व सांडपाणी सोडल्याचे प्रस्तुत प्रतिवादींच्या मिळकतीत त्यांनी जाण्यायेण्याकरीता सोडलेल्या रस्ते वजा खुल्या मिळकतीत चिखल व दलदलीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादींना त्यांचे मिळकतीत खुलेपणाने जाता येत नाही. सदर प्रकाराबाबत प्रतिवादीनी कित्येकदा वादीस तोंडी विनंत्या करुन देखील प्रतिवादीच्या मिळकतीच्या कब्जेवहीवाटला हरएकप्रकारे हार हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीविरुध्द कायम मनाईचा दावा दाखल केलेला आहे.

**१७.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, दि.२९.०६.२०२१ च्या मोजणीनंतर प्रस्तुत प्रतिवादी यांनी जाणेकरीता रस्ता होणेसाठी दावा मिळकतीत मुरुम आणून टाकला. मात्र प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांनी सदर मुरुम पसरु देणेस आडकाठी सुरु केली व ते दावा मिळकतीत आमचा रस्ता आहे असे सदर वादी व प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) म्हणू लागले व दांडगांवा सुरु केला. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी प्रस्तुत प्रतिवादीला दि.१२/०८/२०२१ रोजी रजि.पोस्टाने नोटीस देवून सदर मुरुम पसरण्यास व दावा मिळकतीत वहिवाट करणेस हरकत उपस्थित केली व त्याद्वारे मिळकतीत आमचाच रस्ता आहे असा कांगावा सुरु केला त्यास प्रतिवादीनी दि.३१.८.२०२१ रोजी रजि.पोस्टाने उत्तर दिलेले आहे व त्याद्वारे प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांना त्यांचे अतिक्रमण काढून घेणेस सांगीतले आहे. दि.१८.१.२०२२ रोजी वादी हे दावा मिळकतीत मुरुम पसरुन घेत असताना वादी व प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) यांनी दावा मिळकतीत येवून प्रतिवादींना मुरुम पसरु देणेस हरकत केली व काम बंद पाडले व परत इथे फिरकायचे नाही, नाहीतर तंगडे तोडून ठेवीन अशी धमकी प्रतिवादी नं.१६अ ते १६क (फल्ले कुटुंबिय) व वादी यांनी प्रतिवादी यांना दिली. सबब, अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**१८.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीला सि.स.नं.२९२० व २९२१ मधून केंव्हाही व कधीही जाण्यायेण्याचे वहीवाटीचे हक्क प्राप्त नव्हते व नाहीत. वादीला सि.स.नं.२९११ या मिळकतीला जाण्यायेण्याचा कोणताही हक्क प्राप्त झालेला नव्हता. निव्वळ वादीचे सि.स.नं.२९२४ मधील अतिक्रमण वाचवण्याच्या हेतुने प्रस्तुतचा दावा वादीने आणलेला असून त्यामुळे वादीला मनाई सारखी इक्वीटीची दाद प्रतिवादीविरुध्द मागता येणार नाही. वादीने उल्लेख केलेली सि.स.नं.२९११ ही मिळकत दावा मिळकत म्हणून समाविष्ट नाही. तर जी मिळकत ही दावा मिळकत म्हणून समाविष्ट केलेली आहे.त्यात वादीला कोणताही हक्क नसून तिची मालकी प्रतिवादींची असल्याने प्रस्तुत दावा व मनाईचा अर्ज चालणेस पात्र नाही. दाव्यासोबत जोडलेला हातनकाशा खोटा व चुकीचा आहे.

**१९.** प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने दाव्यात दाखवलेली तथाकथीत दावा मिळकत ही कधीच रस्ता म्हणून नव्हती. उलट ती सि.स.नं.२९११ च्या बाजूने लगत त्या दिशेस तारेचे कंपाऊंड घालून गेली सुमार ५० वर्षे बंदीस्त स्वरुपात असून तेथून कोणालाही येजा करता येत नाही. त्यामुळे वादी व त्यांचे पुर्वहक्कदार व तथाकथित गि–हाईक यांचा येथून जाणेयेणेचा केंव्हाही व कोणताही प्रश्न उद्भवत नाही. वादीस सि.स.नं.२९११ ला लगत दक्षिणेस सुमारे १४ फुटी रुंद असलेला रस्ता तो पुढे जाऊन डांबरी रस्त्यास आगर रोड हमरस्त्यास जावून मिळतो. त्याची शासन दरबारी नोंद देखील आहे. अशी वस्तुस्थिती असताना ती मे.कोर्टापासून लपवून ठेवून मे.कोर्टाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न वादी याने केलेला आहे व सदरचा खोटा दावा हा मे.कोर्टासमोर आणलेला आहे. त्यामुळे वादी हा अज्ञार्थी प्रतिबंधात्मक कायम मनाई व तुर्तातुर्त मनाई मागण्यास मुळीच पात्र नाही. प्रतिवादींनी त्यांची मिळकत कशाप्रकारे उपभोगण्याची हा पुर्णपणे त्यांचा अधिकार असून त्याच्याशी वादीचा काडीमात्र संबंध नाही. वादीची दाव्यातील कथने पाहिली असता तो प्रचलित वहिवाटीच्या कायद्यातील तरतुदींची

पुर्तता करत नाही याही कारणास्तव वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

**२०.** प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी वादीचे दावेस नि.क्र.२७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीची सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील सि.स.नं.२९२० व २९२१ या मिळकती प्रतिवादी नं.१ ते १५ यांच्या मालकीच्या आहेत. तसेच सि.स.नं.२९२२ ही मिळकत प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांच्या मालकीची आहे. सदर सि.स.नं.२९११ ही मिळकत सि.स.नं.२९२० च्या पश्चिम बाजूस आहे. त्यामध्ये वादी हे पुर्वापार लाकुड विक्रीचा व्यवसाय करतात ही बाब सर्व साधारणपणे बरोबर आहे.

**२१.** प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी पुढे कथन केले आहे की, सि.स.नं.२९२० व २९२१ या मिळकतीच्या दक्षिण बाजुस व सि.स.नं.२९२२ च्या उत्तर बाजूस पुर्व–पश्चिम चालीचा १२ फुट रुंदीचा रस्ता आहे ही बाब खरी आहे. सदरचा रस्ता हा सि.स.नं.२९२२ मधील उत्तर बाजुकडील ६ फुट रुंद क्षेत्रातून व सि.स.नं.२९२० व २९२१ मधील दक्षिण बाजुकडील ६ फुट रुंद क्षेत्रातून पुर्व–पश्चिम असा रस्ता गेलेला आहे.

**२२.** प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी त्यांच्या मालकीच्या सि.स.नं.२९२२ मधील क्षेत्र सदर रस्त्याकरीता सोडलेले आहे. तसेच प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी त्यांचे सि.स.नं.२९२० व २९२१ मधील क्षेत्र सदर रस्त्याकरीता सोडलेले आहे. सदर रस्ता हा गावातील सर्व नागरिक तसेच वादी हे वापरत आहेत. परंतु सदर रस्त्यावरती वादी यांचा कोणताही हक्क व अधिकार निर्माण झालेला नाही.

**२३.** प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी वादीस सदर रस्त्यामध्ये कधीही अडवणूक केलेली नव्हती व

नाही अगर रस्त्यामध्ये मोटर सायकल इ.वाहन लावून कोणताही अडथळा केलेला नाही. याउलट यातील प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी सदर रस्त्यावर अलिकडे मुरुमाचा ढिग टाकुन सदर रस्त्यामध्ये अडथळा निर्माण केलेला आहे. यातील वादीनी विणाकारण सदर कामी प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांना पक्षकार केले आहे.

**२४.** प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांनी पुढे कथन केले आहे की, दावा मिळकत सदर रस्त्यामधील दक्षिण बाजुचे ६ फुट क्षेत्र हे यातील प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांच्याच मालकीचे व वहिवाटीचे आहे ही बाब यातील प्रतिवादी नं.१ ते १५ यांना माहीत आहे. सदर दावा मिळकतीमध्ये झालेल्या चुकीच्या नोंदीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी नं.१ ते १५ यांनी खोडसाळपणाने प्रतिवादी नं.१६ अ ते १६ क यांचेविरुध्द मे.दिवाणी न्यायाधीश क.स्तर जयसिंगपूर यांच्या कोर्टात रे.क.नं.२५/२०२२ चा मनाईचा दावा दाखल केलेला आहे व तो सध्या प्रलंबित आहे. सबब, वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

**२५.** वादी व प्रतिवादी यांची कथने वाचली. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. माझे विचारार्थ खालील मुद्दे येतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | यातील वादीने त्यांचे म्हणणे सकृत दर्शनी बरोबर असल्याचे सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने असल्याचे वादीने सिद्ध केले आहे काय? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वादीचे मागणप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे काय? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश कोणता? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

**:: <u>कारणमिमांसा</u> ::**

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>**

**२६.** वरील तीनही मुद्दे हे एकमेकात गुंतले असल्याने एकत्रीतपणे विवेचन केले आहे.

**२७.** वादीने दाव्यात नमुद केले आहे की, सि.स.नं. २९२० व २९२१ या मिळकती यातील प्रतिवादी क्र.१ ते १५ यांच्या मालकीच्या आहेत. तसेच सि.स.नं. २९२२ ही मिळकत प्रतिवादी क्र.१६ अ ते १६ क यांच्या मालकीची आहे. तसेच सि.स.नं. २९११ ही मिळकत वादी यांच्या मालकीची आहे. तसेच प्रतिवादींनी देखील सदर मिळकतींच्या मालकीच्या अनुषंगाने वाद उपस्थित केल्याचे दिसून येत नाही. दोन्ही पक्षांनी कब्जाबाबत, जागा रिकामी सोडल्याबाबत वाद उपस्थित केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर मिळकतींच्या मालकीच्या अनुषंगाने दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही.

**२८.** वादीने दावा कलम नं.४ मध्ये कथन केले आहे की, वादी व त्यांचे भाऊ हे दि.१२.७.१९८८ इ. रोजी पासून म्हणजे सि.स.नं. २९११ ही मिळकत खरेदी घेतलेपासून एकत्रीत सदर मिळकतीमध्ये लाकूड वखारीचा म्हणजे लाकूड विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. परंतु वादीने त्या अनुषंगाने व कथीत दावा मिळकतीच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीच्या सदरहू कथनास कागदपत्रांची जोड असल्याचे दिसून येत नाही.

२९. वादीने दावा कलम नं.३ मध्ये पुढे कथन केले आहे की, सदर सि.स.नं. २९११ ही मिळकत यातील वादी यांचे सख्खे भाऊ बाबुलाल पटेल यांनी रजि.दस्त नं.६२८०/२०१८ ने दि.२८.१२.२०१८ रोजी वादी यांना बक्षीसपत्राने दिली आहे व कलम नं.५ मध्ये नमुद केले आहे की, त्यानंतर तो वहीवाटीचा इजमेंटरी हक्क व अधिकार बाबुलाल पटेल यांनी रजि.दस्त नं.६२८० ने दि.२८.१२.२०१८ रोजी वादी यांना बक्षीसपत्राने दिला आहे. परंतु वादीने दाखल केलेल्या सदर बक्षीसपत्राच्या प्रतीचे अवलोकन करता त्यामध्ये इजमेंटरी हक्क व अधिकार याबाबत स्पष्टीकरणासह नमुद असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्या अनुषंगाने देखील वादीने केलेले कथन हे कागदपत्रांसह प्रथमदर्शनी सिध्द केल्याचे दिसून येत नाही. वादीने नि.क्र.३/१४ ला सि.स.नं. २९११, २९२०, २९२१, २९२२, २९२४, २९२५ चा मिळकतीचा नकाशा दाखल केलेला आहे. त्यामध्ये सुध्दा सदर दावा मिळकत कथीत रोडचा उल्लेख असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीने ते व त्यांचे भाऊ हे कथीत रोडवरुन एकत्रीत काम करीत असल्याचे कागदपत्र दाखल केले नाहीत व बक्षीसपत्रामध्ये ही सदर इजमेंटरी हक्काबाबत नमुद नाही. वादीला सदर मिळकत ही सन २०१८ साली मिळालेली आहे. त्यामुळे त्या तथ्यानुसार वादी सदर कथीत इजमेंटरी हक्काचा अधिकार मागू शकत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

३०. वादीने तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये विनंती सदरामध्ये कलम नं.ब मध्ये सुरुवातीस प्रतिवादी क्र.२ च्या विरुध्द मागणी केली आहे तर दाव्यात तीच मागणी प्रतिवादी क्र.१ ते १५ यांच्याविरुध्द केली आहे. सदर दोन्ही मागण्यांचे अवलोकन होणे गरजेचे आहे. अर्ज व दाव्यातील मागणी ही एकच असल्याचे दिसून येत आहे. तसेच त्या दोन्ही सदर मागण्या मान्य केल्या तर वादीच्या दाव्यातील अंतीम मागणी मंजूर केल्यासारखे होणार आहे. त्यामुळे वादी त्या मागणीस पात्र असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने

प्रतिवादींनी नि.क्र.५२ सोबत दाखल केलेल्या न्यायनिवाडयाचा देखील आधार घेणे गरजेचे आहे. जो की ***Leela Dhar Gera & Another vs. Special Judge, S.C.S.T. Act/ Additional District Judge, Bareilly and others in Civil Misc. Writ Petition No.166 of*** *2010,* ज्यामध्ये नमुद केले आहे की, It is settled in law that final relief cannot be granted by an interim relief. त्यामुळे देखील वादीची त्या अनुषंगाने मागणी ही मान्य करण्याजोगे असल्याचे दिसून येत नाही.

**३१.** त्याचसोबत प्रतिवादींनी नि.क्र.३७ सोबत सदर पाणपट्टी व मोबाईल शॉपीच्या अनुषंगाने दाखल केलेल्या कराच्या पावत्याचे देखील अवलोकन होणे गरजेचे आहे. तसेच त्यासोबत Demand notice of payment of tax, Challan यांचे देखील अवलोकन होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्या कथीत पाणपट्टी व मोबाईल शॉपीच्या अनुषंगाने काढून टाकणेबाबत आदेश करणेपुर्वी दोन्ही पक्षांना त्या अनुषंगाने पुरावा देण्याची मुभा ठेवली गेली पाहीजे. त्यानंतरच त्यावर आदेश पारीत करणे हे संयुक्तीक होणार आहे. तसेच अर्जातील ती मागणी व दाव्यातील ती मागणी ही एकच असल्यामुळे आता जर ती मागणी मंजूर मागणी केली तर दाव्यातील अंतीम मागणी मंजूर केल्यासारखे होणार आहे. त्यामुळे वादी त्या अनुषंगाने मागणीस पात्र असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

**३२.** वादीने तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये विनंती क सदरामध्ये प्रतिवादी क्र.१६अ ते १६क यांनी दावा मिळकतीत त्यांची मोटारसायकल लावू नये म्हणून त्यांचेविरुध्द मनाई मागीतली आहे. परंतु दाव्यातील विनंती सदराचे अवलोकन केले असता वादीने त्या अनुषंगाने अंतीम मागणी ही दाव्याच्या विनंती सदरामध्ये केल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादी क्र.१ ते १५ यांनी रे.क.नं.२५/२०२२ हा दाखल केला आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्या कथनानुसार त्या दाव्यातील प्रतिवादींनी त्यांच्या मिळकतीवर अतिक्रमण केलेले आहे. तसेच त्यांचे त्या दाव्यात कथन आहे की, त्यांनी मोजणी करुन

घेवून त्या संबंधीचा नकाशा ही दाखल केलेला आहे. दाव्यातील पक्षकारांनी दाखल केलेल्या फोटोवरुन त्यांच्या कथनातील तथ्ये ही सिध्द होत नाहीत. तसेच दावा मिळकत ही रोड आहे का त्या मिळकतीच्या मालकांनी ती जागा त्यांच्या वहीवाटीसाठी सोडली आहे हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे केवळ त्या फोटोवरुन अंतीम निष्कर्षापर्यंत येणे हे संयुक्तीक होणार नाही.

३३. वादीने नि.क्र.३९ सोबत दिलीप शामराव शिंगाडे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. परंतु वादीने सदर शपथपत्रामध्ये नमुद सि.स.नं.२९०७ च्या अनुषंगाने सदर साक्षीदाराच्या मिळकतीच्या मालकीच्या अनुषंगाने कागदपत्रे दाखल केली नाहीत, तसेच सदर कथीत रस्ता कोणाच्या मिळकतीतून किती आहे हे ही त्यांनी स्पष्टपणे सांगीतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीतर्फे साक्षीदार यांची मदत वादीस होणार असल्याचे दिसून येत नाही.

प्रतिवादींनी आपली भिस्त खालील न्यायनिवाडयांवर ठेवलेली आहे.

*1. **Unnikrishnan vs. Ponnu Ammal and Ors**, 1998 **DGLS (Ker.)** 480,* ज्यामध्ये नमुद केले आहे की, a suit for injunction to protect an easement by prescription or to prevent an obstruction to an easement by prescription is not maintainable unless there is also a prayer for declaration of the right. परंतु वादीने सुध्दा त्यांच्या दाव्याच्या विनंती सदरामध्ये हक्कज्ञापन होवून मिळणेबाबत मागणी केली आहे.

३४. वादींनी आपली भिस्त खालील न्यायनिवाडयांवर ठेवलेली आहे.

1. **Dilip Kumar Sitaria v/s M Karthik**, 2000 **CJ** (**Mad**) 171, ज्यामध्ये नमुद केले आहे की, Therefore, interim injunction

is granted restraining the respondents and their men from putting up any construction or obstruction in the common passage running from the applicants' house to T.T.K. Road measuring an extent of 11 feet in width and 100 feet in length and also the respondents are hereby directed to remove the wall, constructed in front of the gate of the applicants' house and to remove all the other obstacles so as to enable the applicants to use the said common passage to reach the T.T.K. Road, pending disposal of the suit. Original Application Nos.755 and 756 of 1999 are allowed. Petition allowed. परंतु या प्रकरणामध्ये वादीच्याच कथनानुसार त्यांनी दि.२८.१२.२०१८ रोजी मिळकत कब्जात घेतलेली आहे. वादीने इजमेंटरी हक्काबाबत बक्षीसपत्रात नमुद असल्याचे ही सिध्द केलेले नाही. वर नमुद कथनांवरुन वादीने आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केली नाही. त्यामुळे वादीस सदर न्यायनिवाडयाचा लाभ होणार नसल्याचे स्पष्ट होते.

**३५.** वादाकरीता असे मान्य केले की, वादी व त्यांचा भाऊ यांचा लाकूड विक्रीचा व्यवसाय होता. परंतु केवळ त्यावरुन वादी व त्यांच्या कथीत दुकानातील ग्राहक हे वादीकथीत रोडवरुन येजा करीत होते व त्यांचा त्या रोडवर इजमेंटरी हक्क आहे असे सिध्द होत नाही. तसेच वादीने त्या अनुषंगाने देखील आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केल्याचे दिसून येत नाही. तसेच त्या कथीत रोडबाबत वादी सोडून इतरांनीही तक्रार, हरकत अथवा मागणी केल्याचे अभिलेखावर दाखल असल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादींनी साक्षीदार सागर कुडे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. वादीने देखील सदर साक्षीदाराच्या कथनाप्रमाणे सदर मोबाईल शॉपीबद्दल कथन केलेले आहे. परंतु वर नमुद कथन व कारणावरुन वादीने आपली केस प्रथमदर्शनी शाबीत केल्याचे दिसून येत नाही.

**३६.** वादीने आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केली नाही त्यामुळे आणखीन काही बाजू पाहण्याचे राहीले नाही. त्याकरीता देखील प्रतिवादींनी आपली भिस्त खालील न्यायनिवाडयावर ठेवलेली आहे.

*1. **Bhawana w/o. Late Arbind Bapat and another vs. Navneet s/o. Bhojraj Lakhotia and another,** 2015(3) **Mh.L.J,** 472,* ज्यामध्ये असे नमुद केले आहे की, Injunction– Grant of Considerations – Once it is found that there is no prima facie case established, further aspects of conduct of appellants, balance of convenience, etc. are immaterial and need not be considered.

प्रतिवादींनी आपली भिस्त खालील न्यायनिवाडयावर ठेवलेली आहे.

*1. **K.Krishnamoorthy vs. Nagammal** & **ors. In S.A.No.**79 **of** 2007.* प्रतिवादींचे कथन आहे की, वादीने inconsistent plea घेतली आहे. परंतु त्याकरीता अंतीम निकषापर्यंत येणेसाठी वादी कोणता पुरावा देतो आहे हेही पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे आत्ताच त्यावर भाष्य करणे हे संयुक्तीक होणार नाही.

**३७.** वादीने आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केली नाही. वादीने कथीत रोडच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर दाखल केला नाही. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रावर सदर कथीत रोडचा उल्लेख नाही. वादीने दाव्यात व अर्जात केलेली काही मागणी ही एकच असल्याने जर मागणी मंजूर केली तर दाव्याचीच अंतीम मागणी मंजूर केल्यासारखे होणार आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जर तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर वादीचे नुकसान होणार असल्याचे दिसून येत नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

# आदेश

१. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2024.09.06 14:02:28 +0530

(अ.त्रिं.मनगिरे)

दिनांक ०६/०९/२०२४

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
जयसिंगपूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 06/09/2024. |
| Judgment/order signed by the PO on | 06/09/2024. |
| Judgment/order uploaded on | 06/09/2024. |